ePaper

## सुप्रिया सुळेंनी अजित पवारांच्या पाया पडत घेतला आशीर्वाद!



| वर्ष - 7 | अंक - 188 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरूवार, दिनांक 16 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- भारताची विराट खेळी!
- अजित पवारांची गळचेपी होत असल्याने
- आरक्षण वाढवले; नोकऱ्या कुठे आहेत?
- पुणे पालिकेचा महत्वपूर्ण निर्णय!



# महाविकास आघाडीचं जागावाटप निश्चित?

## » संभाव्य फॉर्म्युला समोर, कुठल्या मतदारसंघातून कोण लढणार?

| मुंबई | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**मोदी सरकारच्या विरोधात देशभरातील विरोधकांनी एकजूट करत 'इंडिया आघाडी'ची स्थापना केली आहे. त्यानंतर जागावाटपाच्या मुद्द्यावर स्थानिक पातळ्यांवर चर्चा सुरु असल्याची माहिती आहे. महाराष्ट्रात महाविकास आघाडीतील घटकपक्षांनीही जागावाटपाची चर्चा सुरु केल्याचं वृत्त आहे. शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी, शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेस या तीन प्रमुख पक्षांनी आगामी लोकसभा निवडणुका एकत्र लढवण्याचं निश्चित केलं आहे.**

जागावाटपात ठाकरे गटाला १९ ते २१, काँग्रेसला १३ ते १५, तर शरद पवार गटाला १० ते १२ जागा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ४८ पैकी ४४ मतदारसंघांचे वाटप झाले असून चार जागांवर चर्चा सुरु असल्याची माहिती आहे.







### महाविकास आघाडीचे संभाव्य जागावाटप

### मुंबई:

**दक्षिण मुंबई :** शिवसेना (ठाकरे गट)
**दक्षिण मध्य :** शिवसेना (ठाकरे गट)
**ईशान्य मुंबई :** शिवसेना (ठाकरे गट)
**उत्तर पश्चिम मुंबई :** शिवसेना (ठाकरे गट)
**उत्तर मध्य मुंबई :** काँग्रेस
**उत्तर मुंबई :** काँग्रेस

### कोकण:

**रत्नागिरी सिंधुदुर्ग :** शिवसेना (ठाकरे गट)
**रायगड :** शिवसेना (ठाकरे गट)
**कल्याण :** शिवसेना (ठाकरे गट)
**पालघर :** शिवसेना (ठाकरे गट)
**ठाणे :** शिवसेना (ठाकरे गट)
**भिवंडी :** राष्ट्रवादी (शरद पवार)

### विदर्भ

**नागपूर :** काँग्रेस
**वर्धा :** काँग्रेस
**चंद्रपूर :** काँग्रेस
**गडचिरोली :** काँग्रेस
**भंडारा गोंदिया :** काँग्रेस किंवा राष्ट्रवादी (शरद पवार)
**अमरावती :** काँग्रेस किंवा राष्ट्रवादी (शरद पवार)
**यवतमाळ-वाशिम :** शिवसेना (ठाकरे गट)
**बुलढाणा :** शिवसेना (ठाकरे गट)
**रामटेक :** शिवसेना (ठाकरे गट)
**अकोला :** वंचित बहुजन आघाडीसाठी राखीव, अन्यथा काँग्रेस

### मराठवाडा

**नांदेड :** काँग्रेस
**लातूर :** काँग्रेस
**धाराशिव :** शिवसेना (ठाकरे गट)
**छत्रपती संभाजीनगर :** शिवसेना (ठाकरे गट)
**परभणी :** शिवसेना (ठाकरे गट)
**बीड :** राष्ट्रवादी (शरद पवार)
**हिंगोली :** राष्ट्रवादी (शरद पवार) किंवा शिवसेना (ठाकरे गट)
**जालना :** राष्ट्रवादी (शरद पवार) किंवा शिवसेना (ठाकरे गट)

### उत्तर महाराष्ट्र

**धुळे :** काँग्रेस
**नंदुरबार :** काँग्रेस
**जळगाव :** राष्ट्रवादी (शरद पवार)
**रावेर :** राष्ट्रवादी (शरद पवार)
**दिंडोरी :** राष्ट्रवादी (शरद पवार)
**नगर :** राष्ट्रवादी (शरद पवार)
**नाशिक :** शिवसेना (ठाकरे गट)
**शिर्डी :** शिवसेना (ठाकरे गट)

### पश्चिम महाराष्ट्र

**पुणे :** काँग्रेस
**सोलापूर :** काँग्रेस
**बारामती :** राष्ट्रवादी (शरद पवार)
**माढा :** राष्ट्रवादी (शरद पवार)
**सातारा :** राष्ट्रवादी (शरद पवार)
**शिरूर :** राष्ट्रवादी (शरद पवार)
**कोल्हापूर :** शिवसेना (ठाकरे गट)
**मावळ :** शिवसेना (ठाकरे गट)
**सांगली :** काँग्रेस किंवा राष्ट्रवादी (शरद पवार)
**हातकणंगले :** स्वाभिमानी शेतकरी संघटनेसाठी राखीव, अन्यथा राष्ट्रवादी (शरद पवार)

## ठाकरेंना सर्वाधिक जागा, मग नंबर काँग्रेसचा!



*» आगामी लोकसभा निवडणुकांसाठी महाविकास आघाडीचे जागावाटप निश्चित झाल्याचे वृत्त बुधवारी वाऱ्यासारखे पसरले. त्यानंतर राज्यभरात चर्चेला उधाण आले असतानाच, काँग्रेसने मात्र हे वृत्त फेटाळले आहे. लोकसभेच्या जागावाटपाबाबत अद्याप कोणताही अंतिम निर्णय झालेला नसल्याचे पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'ला सांगितले. पाच राज्यांतील विधानसभांच्या निकालानंतर याबाबत पुढील चर्चा करण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.*

*आगामी लोकसभा निवडणुकांसाठी महाविकास आघाडीच्या जागावाटपाबाबत गेल्या अनेक दिवसांपासून चर्चा सुरू होती. जवळपास सर्वच पक्षांनी याबाबत विचारविनिमय करण्यास सुरुवात केली असतानाच राज्यातील ४४ जागांसाठी आघाडीने 'फॉर्मुला' निश्चित केल्याचे वृत्त पसरले. ठाकरे गटाच्या शिवसेनेला १९ ते २१ जागा, काँग्रेसला १३ ते १५ जागा आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला १० ते १५ जागांचे वाटप झाल्याचे यात म्हटले होते. उर्वरित चार जागांसाठी लवकरच निर्णय घेण्यात येणार असून, यातील दोन जागा इतर पक्षांसाठी असल्याचे सांगण्यात येत होते.*

*दरम्यान, याबाबत पटोले यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी हे वृत्त फेटाळून लावले. 'आघाडीच्या जागावाटपाबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. सध्या इतर राज्यांत निवडणुका सुरू आहेत. त्यांचे निकाल जाहीर झाल्यानंतर याबाबत बैठक होऊन जागावाटपाबाबत निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच काही जण जाणीवपूर्वक अफवा पसरवत असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.*

# धूळ नियंत्रणासाठी पुणे पालिकेचा महत्वपूर्ण निर्णय!

## » अति रहदारीच्या चौकात उभरणार कारंजे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील प्रदूषणात वाढ झाल्याने ते नियंत्रणात ठेवण्यासाठी महापालिकेकडून उपाययोजनांना सुरुवात झाली आहे. त्याअंतर्गत अति रहदारीच्या ठिकाणी कारंजे उभारण्याचे नियोजित असून पहिल्या टप्प्यात २० ठिकाणी कारंजे उभारण्यात येणार आहेत.**

कारंज्यांमुळे धूळ नियंत्रणात राहील, असा दावा महापालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे. पुणे, मुंबईसह राज्यातील अनेक शहरांमधील प्रदूषणाची पातळी वाढली असून, नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयानेही हवेच्या ढासळत्या गुणवत्तेबाबत चिंता व्यक्त करताना तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश महापालिकांना दिले आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार महापालिका प्रशासनाकडूनही उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. शहरातील वायू प्रदूषण नियंत्रणात आहे. अन्य



शहरांच्या तुलनेत हवेची गुणवत्ता चिंताजनक पातळीवर पोहोचलेली नाही. मात्र, दक्षतेचा उपाय म्हणून शहरातील २० ठिकाणी कारंजे बसविण्याचे नियोजित आहे. संचेती चौक, जंगली महाराज रस्ता, येरवडा चौक, लोकमान्य टिळक चौक, शनिवारवाडा चौक आणि स्वारगेट चौक या प्रमुख चौकांचा यामध्ये समावेश असून, हे सर्व चौक अति रहदारीचे आहेत. यामुळे धुलिकण जमिनीवर स्थिर होण्यास मदत होणार आहे, असा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे. रहदारीच्या चौकांचा अभ्यास करून हा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, शहरातील प्रदूषण नियंत्रणात ठेवण्यासाठी नैसर्गिक इंधनावरील (सीएनजी) आणि वीजेवर धावणारी वाहने खरेदीचे धोरण महापालिकेने स्वीकारले आहे. त्यादृष्टीने महापालिकेच्या अधिकारी वर्गासाठीही वीजेवर धावणाऱ्या गाड्यांची खरेदी करण्यात आली आहे. तर रिक्षांचे सीएनजीमध्ये रूपांतर करण्यासाठी महापालिकेकडून प्रोत्साहन निधी दिला जात आहे.

### शहरातील 20 ठिकाणी कारंजे

» शहरातील वायू प्रदूषण नियंत्रणात आहे. अन्य शहरांच्या तुलनेत हवेची गुणवत्ता चिंताजनक पातळीवर पोहोचलेली नाही. मात्र, दक्षतेचा उपाय म्हणून शहरातील २० ठिकाणी कारंजे बसविण्याचे नियोजित आहे. संचेती चौक, जंगली महाराज रस्ता, येरवडा चौक, लोकमान्य टिळक चौक, शनिवारवाडा चौक आणि स्वारगेट चौक या प्रमुख चौकांचा यामध्ये समावेश असून, हे सर्व चौक अति रहदारीचे आहेत. यामुळे धुलिकण जमिनीवर स्थिर होण्यास मदत होणार आहे, असा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे. रहदारीच्या चौकांचा अभ्यास करून हा निर्णय घेण्यात आला आहे.

# प्रसाद सस्ते यांची महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी निवड!

## » राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेच्या निवड चाचणीत यश

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या मान्यतेने धाराशिव येथे ६५ वी महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा पार पडणार आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद यांच्या निरीक्षणखाली पिंपरी-चिंचवड येथे त्यासाठी निवड चाचणी कुस्ती स्पर्धा घेण्यात आली. पै. बाळासाहेब रामचंद्र लांडगे (वस्ताद) यांच्या ६९ वा वाढदिवसा निमित्ताने या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत ८१ खेळाडूंनी सहभाग घेतला. या मध्ये प्रसाद सस्ते हा महा केसरीचे मानकरी ठरला.**

पै. नितिन बाळासाहेब लांडगे, महेशदादा स्पोर्टस फाऊंडेशन, भवानी तालीमच्या वतीने याचे संयोजन करण्यात आले. पैलवान मारुती रावजी लांडगे आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुल भोसरी येथे या स्पर्धा पार पडल्या. पैलवान किसन शंकर लांडगे यांच्या हस्ते उदघाटन झाले. आमदार महेश किसन लांडगे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या वेळी माजी नगरसेवक लक्ष्मण सस्ते, सागर गवळी, संतोष लोंढे, नंदकुमार लांडे, दत्ता गव्हाणे, दामोदर फुगे, मदन गव्हाणे, गणपत गव्हाणे, रंगनाथ फुगे, शिवाजी गव्हाणे, भगवान लोंढे, राजाराम फुगे, महाराज सोपान फुगे, बाळासाहेब गवळी, राजेंद्र लांडगे, विजय लांडगे,' मारुती लांडगे, शिवाजी लांडगे,' पै. विनय लांडगे, पै. बाबा तांबे, माऊली कुटे', पंडित मोकाशी-बोराडे, बबन बोऱ्हाडे, योगेश लांडगे, तुळशिराम लोंढे, सुरेश लोंढे,, हिरामण लांडगे, अनिल फूगे, सतीश गावडे, अनिल लोंढे, पप्पु काळभोर,ज्योती बारणे, भाऊसाहेब लांडे, कैलास माने, देवा माने,रतन लांडगे, लाला लांडगे, अंकुश लोंढे, किशोर नखाते आदींसह भोसरीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

नितिन लांडगे, नारायण लांडगे, विष्णु लांडगे, अजय लांडगे, स्वप्नील लांडगे, गणेश लांडगे, संतोष लांडगे महाराज, कालिदास लांडगे, राहुल गवळी, रूपेश जाधव आदींनी या निवड चाचणी स्पर्धेचे संयोजन केले. चंद्रकांत मोहोळ, रोहिदास आमले, निलेश मारणे यांनी पंच म्हणून काम पाहिले. महाराष्ट्र चॅम्पियन पुणे पोलीस पैलवान स्वप्नील लांडगे यांनी सर्व कुस्तीपटू व वस्ताद यांचे आभार मानले.

### स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे

» गादी विभागात - 57 किलो वजनी गटात प्रणव सस्ते, सुयस दास यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. 61 किलो वजनी गटात योगेश तापावर, प्रथमेश पाटील यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. 65 किलो वजनी गटात महेश जाधव, राहुल माने यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. 70 किलो वजनी गटात परशुराम कँप, स्वप्निल सुकुंडे यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. 74 किलो वजनी गटात दिग्विजय काळे, अजिंक्य सांडभोर यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. 79 किलो वजनी गटात पवन माने याला प्रथम क्रमांक प्राप्त झाला. 86 किलो वजनी गटात सौरभ शिंगाडे, यश भोखे यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. 92 किलो वजनी गटात सौरभ जाधव, निरंजन बालवडकर यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक मिळाला. 97 किलो मध्ये शुभम गवळी याला प्रथम तर रणजीत मोकाशी याला द्वितीय क्रमांक मिळाला.



### माती विभागात -

» 57 किलो मध्ये श्री जाधव, महेश सलगर यांना यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. 61 किलो वजनी गटात अजिंक्य माचुडे रुद्र वाळुंजकर यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. 65 किलो मध्ये संकेत माने प्रथम तर अमित म्हस्के म्हस्के याला द्वितीय क्रमांक मिळाला. 70 किलो मध्ये किरण तळेकर, जय वाळके यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. ७४ किलो मध्ये रवींद्र गोरेड कर्तिक फुगे यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. 79 किलो मध्ये अनिकेत लांडे प्रथम तर पृथ्वीराज जाधव याला द्वितीय क्रमांक मिळाला. ८६ किलो वजनी गटात यशराज अमराळे, विशाल कोळी यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. ९२ किलो मध्ये विवेक शेलार, पवन चव्हाण यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. ९७ किलो वजनी गटात तेजस फेंगसे, यश नखाते यांना अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

## शेवटच्या घटकांपर्यंत भाजपाने साजरी केली

# दिवाळी अन् भाऊबीज!

## शहराध्यक्ष शंकर जगताप यांचा विधायक उपक्रम:

## मावळातील आदिवासी पाड्यांवर मिठाई, कपडे वाटप

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शेवटच्या घटकांपर्यंत विकास..." हा भाजपाचा विचार आहे. या ध्येयानुसार देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकार काम करीत आहे. तळागाळातील लोकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची प्रेरणा त्यामुळे आम्हाला मिळते. यातूनच आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी केली आणि भगिनींना भाऊबीज भेट दिली. अशा उपक्रमांसाठी सर्वांनीच पुढाकार घेणे गरजेचे आहे, अशी भावना पिंपरी-चिंचवड भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केली.**



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी सीमेवर जवानांसोबत दिवाळी साजरी करतात. याचा आदर्श घेऊन राज्यात भाजपाच्या वतीने आदिवासी पाड्यांवर दिवाळी साजरी करावी, असे आवाहन प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले होते. त्याला प्रतिसाद देत शहर भाजपाच्या वतीने मावळ तालुक्यातील अंदर मावळ भागातील कुसावली, वानगाव, नागवली येथील कातकरी, आदिवासी बांधवासाठी दिवाळी फराळ तसेच महिलांसाठी साडीचोळीचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी कुसावलीच्या सरपंच चंद्रभागा चिमटे, माजी सरपंच कैलास खांडभोर, डाहुली ग्रामपंचायतचे उपसरपंच बळीराम वाडेकर, ग्रामपंचायत सदस्य स्वामी जगताप, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे माजी नगरसेवक जयवंतआप्पा बागल, मनोज ढोरे, संतोष पिंपळे, योगेश चोपडे, भाजपाचे सागर फुगे, संजय गांधी निराधार योजनेचे सदस्य संजय मराठे, सामाजिक कार्यकर्ते अजय दुधभाते, सुनील कोकाटे, संदीप दरेकर, अनिकेत पाडाळे, संतोष मांदळे, उल्हास असवले, गणेश बँकेचे संचालक प्रमोद ठाकर, उमेश झरेकर, युवराज



कदम, शुभम गायकवाड, मिलिंद कंक, जीवन जाधव, सुशांत जाधव, अमित शिंदे, प्रसाद नवले यांच्यासह गावातील तंटामुक्ती कार्यकर्ते, पोलीस पाटील, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहर भाजपाच्या वतीने हा विधायक उपक्रम मावळ मतदार संघातील दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी बांधवांसाठी रबविण्यात आला. विविध पाड्यांवर राहणाऱ्या सुमारे साडेचार हजार आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी करण्यात आली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये राहणाऱ्या या आदिवासी बांधवांच्या चेहऱ्यावर या उपक्रमामुळे आनंद दिसून आला.

शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, अजूनही दुर्गम भागात आपले आदिवासी बांधव राहतात. अतिशय प्रतिकूल परिस्थिती देखील आपल्या संस्कृतीचे ते रक्षण करतात. अशा वेळी या बांधवांना आपल्या आनंदात सहभागी करून घेतल्यास आपला आनंद देखील निश्चितच द्विगुणित होणार आहे.

> "दिवाळी हा दिव्यांचा सण. याच दिवशी दिव्यांच्या साहाय्याने आपण आपले अंगण उजळवतो. 'वसुधैव कुटुम्बकम', या प्रमाणे परिस्थितीशी झगडणारे आदिवासी बांधव आपल्या समाजाचा घटक आहेत. अशा पवित्र सणाच्या वेळी खाऊ, फराळ, नवीन कपडे यांच्या माध्यमातून त्यांच्या जीवनात आनंद पसरविणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. देशाच्या सर्वोच्च 'राष्ट्रपती' पदी श्रीमती द्रौपदी मूर्म यांची निवड करीत भाजपा जगाला विधायक संदेश दिला आहे. आदिवासी बांधवांना फराळ आणि भेटवस्तू देण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले भाव मनाला समाधान देणारे होते.
>
> **- शंकर जगताप, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

---

# अर्जाच्या रकान्यात आता तृतीयपंथीयांनाही स्थान!

## महापालिकेच्या विविध सोई-सुविधा देताना तसेच, लाभ देताना कागदोपत्री लिंग रकाना

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या वतीने (PCMC) शहरातील नागरिकांकडून विविध प्रकाराचे अर्ज स्वीकारले जातात. तसेच, मागविले जातात. त्या अर्जावरील लिंग या प्रकारामध्ये स्त्री आणि पुरूष असे रकाने असतात. त्या रकान्यात आता तृतीयपंथीयांनाही स्थान मिळाले आहे.**

तृतीयपंथी व्यक्तींना सर्वसामान्य नागरिकांप्रमाणे महापालिकेच्या विविध सोई-सुविधा देताना तसेच, लाभ देताना कागदोपत्री अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. महापालिकेतर्फे स्वीकारले जाणारे किंवा मागविले जाणारे अर्ज व आवेदनपत्र भरताना त्यावर लिंग



या रकानासमोर स्त्री आणि पुरूष असा पर्याय असतो. तेथे तृतीयपंथी असा पर्याय उपलब्ध नसल्याने तो तृतीयपंथीयांवर अन्याय आहे.

### शेखर सिंह यांचा आदेश

तृतीयपंथी हा समाजाचा घटक (PCMC) आहे. त्यांनाही सन्मानाने जगण्याचा आणि महापालिकेच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचा मूलमूत अधिकार आहे. ही बाब विचारात घेऊन महापालिकेच्या सर्व विभागांकडून अर्ज मागविताना त्या अर्जावर स्त्री, पुरूष तसेच, तृतीयपंथी असा रकाना उपलब्ध करून द्यावा, असे आदेश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी सर्व विभागप्रमुखांना दिले आहेत. त्यामुळे यापुढे महापालिकेच्या सर्व अर्ज व आवेदनपत्रांवर लिंग या प्रकारासमोर स्त्री, पुरुष व तृतीयपंथी असे तीन पर्यायी रकाने उपलब्ध असणार आहेत.

# पैशाला पुजणे आणि अर्थव्यवस्थेचे सुजणे




**लक्ष्मीपूजनाच्या पूर्वसंध्येला भारतीय रुपयाचा विनिमयदर घसरला. एका अमेरिकी डॉलरसाठी ८३.३० रुपये, इतका हा दर खालावला. मात्र लक्ष्मीपूजनाच्या सायंकाळी मुंबई शेअर बाजारात झालेले 'मुहूरत सौदे' भरभराटीचे ठरले आणि या बाजाराचा निर्देशांक (BSE SENSEX) ०.५५ टक्क्यांनी वधारला.**

या दोन घडामोडी वरवर पाहाता विसंगत आहेत पण त्यातून भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीतील विसंगतीच उघड होतात! भारतीय अर्थव्यवस्था 'पाचव्या क्रमांकाची' झाल्याचे सांगितले जाते. 'ब्रिटनलाही आपल्या अर्थव्यवस्थेने मागे टाकले' याचा तर डंकाच पिटला गेला. व्हॉटस्ॲप विद्यापीठाची पदवी मिरवणाऱ्यांना फक्त एवढेच कळते की भारतीय अर्थव्यवस्थेने मोदींच्या काळात ब्रिटनच्याही पुढे वाटचाल केली आहे. परंतु हे अत्यंत मर्यादित अर्थानेच खरे आहे, हे सर्वांना उमगते आहे का? हे खरे आहे की अर्थव्यवस्थेच्या आकारात आपण सहाव्या स्थानावरून पाचव्या स्थानावर आलो, पण म्हणून आपण खरोखरच ब्रिटन पेक्षा श्रीमंत झालोत का? अगदी सोप्या भाषेत सांगावयाचे झाल्यास समजा एका १००० लोकसंख्या असलेल्या गावाचे एकंदर उत्पन्न समजा एक लाख रुपये आहे पण या गावातील १० टक्के जमीनदारांचेच उत्पन्न ९०.०००/- रुपये आहे व बाकी ९० टक्के मजूर आहेत व त्यांचे एकंदर उत्पन्न फक्त रुपये १०,०००/- ! म्हणजे गाव जरी श्रीमंत वाटत असले तरी ९० टक्के जनता ही गरीब आहे हे सामान्य जनतेच्या लक्षात येत नाही. हाच प्रकार आपल्या देशाच्या बाबतीत झाला आहे. आता ब्रिटन व भारताचा तुलनात्मक अभ्यास केल्यास हे गौडबंगाल लगेच लक्षात आल्याशिवाय राहात नाही.



(१) भारताची लोकसंख्या १४० कोटी व आपला जीडीपी-सकल राष्ट्रीय उत्पन्न आहे ३.१८ ट्रिलियन डॉलर (१ ट्रिलियन = १ लाख कोटी डॉलर )

(२) ब्रिटनची लोक संख्या आहे ६.७० कोटी, पण जीडीपी आहे ३.१३ ट्रिलियन डॉलर

(३) याचा अर्थ 'दर डोई उत्पन्न' किंवा 'पर कॅपिटा जीडीपी'ची तुलना केल्यास, भारताचे दरडोई उत्पन्न २२७७.४० डॉलर दरवर्षी (डॉलरचा दर ८२ रुपये धरल्यास, अंदाजे) १ लाख ८७ हजार रुपये. याउलट ब्रिटनचे दरडोई उत्पन्न आहे ४७,३३४.४० डॉलर (म्हणजे याच डॉलर-रुपया दरात सांगायचे झाल्यास) ३८ लाख ८१ हजार रुपये! प्रत्येक देशाची गरिबीची व्याख्याही वेगवेगळी आहे. भारतात गरिबीची व्याख्या म्हणजे ज्या कुटुंबाचे घरगुती वार्षिक उत्पन्न जर रुपये २७,०००/- पेक्षा कमी असेल तर ते कुटुंब गरिबीरेषेच्या खाली मानले जाते व ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २७००० रुपयांहून अधिक पण एक लाख रुपयांपेक्षा कमी असेल ते कुटुंब गरिबीरेषेच्या वरचे अल्प उत्पन्नधारक असे समजले जाते.

भारत जवळपास २२ टक्के जनता गरिबीरेषेच्या खाली येते, म्हणजे जवळपास १४० कोटी पैकी ३१ कोटी जनता ही गरीबीरेषेखाली आहे- ज्यांचे वार्षिक उत्पन्न हे २७००० रुपयांपेक्षा कमी आहे. गरिबीरेषेची ही व्याख्यासुद्धा वास्तविकतेला धरून नाही. २७,०००/- हे एका कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न म्हणून गृहीत धरलेले आहे. हे खूपच फसवे आहे कारण २७०००/- रुपयांत पाच व्यक्तींचे कुटुंब एक महिना तरी उदर निर्वाह करू शकेल का? म्हणूनच आज ८१ कोटी जनतेला 'पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजने' अंतर्गत धान्य वाटप करावे लागत आहे आणि तिची मुदत पाच वाढवण्याच्या घोषणेत धन्यता मानावी लागते आहे. या धान्यवाटप योजनेवरून एक नक्की की, १४० कोटी जनतेपैकी ८१ कोटी जनता गरीब आहे हे सिद्ध होते व याचे गुणोत्तर-प्रमाण काढले तर ते जवळपास ५७.८५ टक्के म्हणजे प्रत्येक शंभर भारतीयांपैकी ५८ भारतीय गरीब, असे येते. जागतिक भूक निर्देशांकानुसार भारत १२५ देशात १११ स्थानावर आहे जो डॉ मनमोहनसिंग ह्यांच्या काळात ५५ व्या स्थानावर होता. आपल्यापेक्षा बांगलादेशासारखे आपले शेजारील देश चांगल्या स्थितीत आहेत.

याउलट ब्रिटनमध्ये ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २५००० पाउंड म्हणजे (एक पाउंड = १०२ रुपये या दरानेही अंदाजे) २५ लाख रुपये असते, त्यांना गरीब म्हणून संबोधण्यात. अशा प्रकारचे गरीब लोक ब्रिटनमध्ये १४.४ दशलक्ष म्हणजे १ कोटी ४४ लाख आहेत.

## संपादकीय »

### भाऊबीज : समर्पित सण

***भाऊबीज म्हणजेच यमद्वितीया. या दिवशी यम देवता आपल्या बहिणीकडे म्हणजे यमुनेकडे जेवायला गेली, त्याची आठवण म्हणून त्या दिवसाला यमद्वितीया असे नाव पडले.***

या दिवशी भावाने बहिणीकडे जेवायला जाऊन तिला वस्त्र, अलंकार अशी एखादी भेट देण्याची प्रथा आजही पाळली जाते. जुन्या कथेनुसार बहिणीने भावाचे रक्षण केले म्हणून भावाने तिला ओवाळणी घालण्याची पद्धत सुरू झाली. यमद्वितीयेच्या दिवशी नरकात खितपत पडलेल्या जीवांना एक दिवसापूर्वी मोकळीक मिळते, अशी श्रद्धा आहे. यमद्वितीया आणि गोवत्सद्वादशी हे दोन वेगळे सण आहेत. पण ते दिवाळीला इतके लागून येतात की, त्यांचा समावेश दिवाळी उत्सवातच केला गेला. यमद्वितीया हे एक व्रतदेखील असून त्या दिवशी यमधर्म, यमदूत, यमुना, चित्रगुप्त, मार्कंडेय आणि पितर अशा सर्वांची पूजा करावयाची असते. यम ही एक वैदिक देवता आहे. तो मूत्यूरूप आहे. यमाचे काम आणि त्याचे सामर्थ्य वर्णन करणाऱ्या अनेक ऋचा ऋग्वेदात आहेत. यमाच्याच सह पितर राहतात, पूर्वज ज्या गमनमार्गाने गेले, तो मार्ग यम जाणतो आणि अग्नी हा यमाचा प्रतिनिधी आहे.

**मधुमेह कधीच बरा होऊ शकत नाही, असे सांगत रुग्णांवर औषधांचा मारा केला जातो. पण मधुमेहाच्या औषधोपचारांइतकेच महत्त्वाचे आहेत ते जीवनशैलीमधले बदल. ते सहजसोपे आणि हमखास परिणाम घडवणारे असतील तर करून बघायला काय हरकत आहे? गेल्या दहा वर्षांपासून मी जीवनशैलीच्या माध्यमातून वजन कमी करणे आणि मधुमेह प्रतिबंध/मुक्ती यासाठी काम करत आहे.**

# नजरिया बदलो.. नजारे बदल जायेंगे!

'स्थूलत्व आणि मधुमेह- मुक्त विश्व' या मोहिमेद्वारे मी आणि माझे सहकारी लोकांचे प्रबोधन करत आहोत. ही मोहीम ४१ देशांत पोहोचली आहे. वजन कमी होण्याच्या, मधुमेहपूर्व अवस्थेतून मधुमेहमुक्त होण्याच्या आणि मधुमेही रुग्णांच्या औषधांवाचून मधुमेह नियंत्रणात आल्याच्या शेकडो यशोगाथा आम्ही आमच्या वेबसाइटवर, फेस बुक पेज/ग्रुप आणि व्हॉट्सॲप ग्रुपवर प्रसिद्ध केल्या आहेत. 'वन्स देअर वॉज डायबेटिस' या मराठी, इंग्रजी, हिंदीत प्रकाशित झालेल्या पुस्तकात औषधे न घेता मधुमेह नियंत्रणात आणणाऱ्या २५ सदस्यांच्या यशोगाथा आहेत. असेच १०० यशोगाथांचे पुस्तक लवकरच प्रकाशित होत आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक- गुजरात – गोवा या तीन राज्यांमध्ये आम्ही १४ मधुमेहमुक्ती समुपदेशन केंद्रे चालवतो ज्यात २५ एम. डी. (मेडिसिन) किंवा मधुमेहतज्ज्ञ डॉक्टर मार्गदर्शन करतात. याचा फायदा आजवर अकरा हजारांहून



जास्त रुग्णांनी घेतला आहे. इन्फोसिस फाऊंडेशनने आणि सीटीआर कंपनीने आर्थिक साह्य केल्याने पुणे, नागपूर आणि नाशिक या तीन शहरांमध्ये मधुमेहमुक्ती समुपदेशन केंद्रे दररोज कार्यरत आहेत. या प्रत्येक केंद्रात २०२५ च्या ऑगस्टपर्यंत किमान एक हजार मधुमेही रुग्णांना डायबेटिस रेमिशन अवस्थेत न्यायचे आमचे ध्येय आहे. डायबेटिस रेमिशन म्हणजे मधुमेहाची कोणतीही औषधे न घेता एचबीएवनसी (तीन महिन्यांची सरासरी रक्त शर्करा) किमान तीन महिने साडेसहा ग्रॅमपेक्षा कमी राहायला हवे. ही मोहीम पूर्णपणे मोफत आहे. या लेखात गेल्या दहा वर्षांच्या अनुभवातून आम्हाला मधुमेहाबाबत काय नवीन शिकायला मिळाले आणि त्याचा मधुमेहावर उपचार करणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टरांना कसा उपयोग होईल याविषयी ऊहापोह केला आहे. गेल्या काही वर्षांत आम्ही विविध आस्थापनांसाठी मधुमेहमुक्ती कार्यक्रम राबवले आहेत. भिलवडीच्या डेअरीतील कर्मचारी, हुपरीच्या एका चांदी उद्योगातील कर्मचारी आणि गुजरात राज्याच्या सोमनाथ गिर जिल्ह्यातील कर्मचारी यांच्या अभ्यासातून आमच्या लक्षात आले की एचबीएवनसी तपासणी केल्याने मधुमेह असल्याचे माहीत असलेले लोक सोडून किमान ३० टक्के इतर व्यक्तींना त्या मधुमेहपूर्व अवस्थेत आहेत किंवा मधुमेही आहेत हे समजले! त्यामुळे ज्याला रक्तशर्करा तपासायला सांगितले जाते तो आदल्या दिवशी कमीच खातो, गोड खात नाही आणि कधी कधी तर चार-पाच किलोमीटर चालूनसुद्धा येतो! साहजिकच तपासणी नकारार्थी येते आणि मधुमेह असला तरी त्याचे निदान होत नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला '**महाईन्यूज**'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी विलंब लागणार?

## » अधिक मुदत मिळविण्याचा सरकारचा प्रयत्न

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाला काही महिन्यांचा अवधी लागणार असून मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे यांनी दिलेल्या २४ डिसेंबरपर्यंतच्या कालावधीत ते शक्य नाही. अपुऱ्या माहितीच्या आधारे घाईघाईने अहवाल दिल्यास न्यायालयीन लढाईत अडचण येईल. त्यामुळे राज्य सरकारकडून अधिक मुदत मिळविण्याचा राज्य सरकार प्रयत्न करणार आहे, असे उच्चपदस्थ सूत्रांनी ' लोकसत्ता ' सांगितले.**



हे मराठा आरक्षणासाठी राज्य सरकारवर दबाव आणण्यासाठी आजपासून (बुधवार) राज्यभर दौरा करणार आहेत. पुणे जिल्ह्यातील भोरपासून ते दौरा सुरू करीत असून त्यांच्या दीड महिन्यात अनेक सभा होणार आहेत. सरकारला आरक्षणासाठी दिलेली २४ डिसेंबरची मुदत अखेरची असून ती वाढवून दिली जाणार नाही, असे जरांगे यांनी आधीच स्पष्ट केले आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाबाबत राज्य सरकार दोन पातळ्यांवर वेगाने काम करीत आहे. मराठवाड्यातील मराठा-कुणबी अशा पूर्वजांच्या नोंदी असलेल्यांना कुणबी दाखले देण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या नोंदी शोधण्यासाठी सरकारने उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली असून तिचा अहवाल १५ ते २० डिसेंबरपर्यंत अपेक्षित आहे. पण समितीला हैदराबादला निजामकालीन कागदपत्रे तपासूनही २०-२२ हजारापर्यंत नोंदी सापडतील, असा अंदाज आहे. त्यांचा लाभ तीन ते चार लाख मराठा समाजातील नागरिकांना होईल. सरसकट कुणबी प्रमाणपत्रे देण्याची जरांगे यांची मागणी असली तरी ती मान्य करणे सरकारला शक्य नाही व कायदेशीर मुद्द्यांवर तो निर्णय न्यायालयातही टिकणार नाही. त्याचबरोबर त्यास ओबीसींचाही प्रखर विरोध आहे. त्यामुळे सरकारने दुसऱ्या पातळीवर मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्याचे काम राज्य मागासवर्ग आयोगाकडे नव्याने सोपविले आहे. यासाठी आधी नेमले गेलेल्या न्या. बापट आणि न्या. गायकवाड आयोगातील आकडेवारी, शास्त्रीय सांख्यिकी व अन्य मुद्दे आवश्यकतेनुसार वापरण्याची मुभा सरकारने मागासवर्ग आयोगाला दिली आहे. न्या. बापट यांनी मराठा समाज मागासलेला नसल्याचा अहवाल दिल्याने तर सर्वोच्च न्यायालयाने न्या. गायकवाड आयोगाचे निष्कर्ष व अहवाल फेटाळल्याने आयोगाला नव्याने सर्वेक्षण करावे लागणार आहे. आधीच्या अहवालातील न्यायालयाने अमान्य केलेले मुद्दे व त्रुटी दूर करून नव्याने शास्त्रीय सांख्यिकी गोळा करावी लागणार आहे. त्यास काही महिन्यांचा कालावधी लागणार असल्याचे सूत्रांनी नमूद केले. त्यामुळे आयोगाच्या कामकाजाची प्रगती तपासून २४ डिसेंबरआधी जरांगे यांच्याकडून आणखी काही महिन्यांची मुदत मागण्याचा सरकार प्रयत्न करणार आहे.

### अहवाल 15 ते 20 डिसेंबरपर्यंत अपेक्षित

» मराठा आरक्षणाबाबत राज्य सरकार दोन पातळ्यांवर वेगाने काम करीत आहे. मराठवाड्यातील मराठा-कुणबी अशा पूर्वजांच्या नोंदी असलेल्यांना कुणबी दाखले देण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या नोंदी शोधण्यासाठी सरकारने उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली असून तिचा अहवाल १५ ते २० डिसेंबरपर्यंत अपेक्षित आहे. पण समितीला हैदराबादला निजामकालीन कागदपत्रे तपासूनही २०-२२ हजारापर्यंत नोंदी सापडतील, असा अंदाज आहे. त्यांचा लाभ तीन ते चार लाख मराठा समाजातील नागरिकांना होईल. सरसकट कुणबी प्रमाणपत्रे देण्याची जरांगे यांची मागणी असली तरी ती मान्य करणे सरकारला शक्य नाही व कायदेशीर मुद्द्यांवर तो निर्णय न्यायालयातही टिकणार नाही.

---

# अजित पवारांची गळचेपी होत असल्याने अमित शाह यांची भेट

## » आजारपणातून उठून त्यांनी थेट दिल्ली गाठल्याने चर्चांना उधाण

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रवादीचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या सक्रिय राजकारणापासून दूर आहेत. गेल्या आठवड्यात ते अचानक केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या भेटीसाठी गेले. आजारपणातून उठून त्यांनी थेट दिल्ली गाठल्याने अनेक चर्चांना उधाण आले होते. परंतु, ही पूर्वनियोजित भेट असल्याचं भाजपाकडून स्पष्ट करण्यात आलं.**

परंतु, यावरून अद्यापही आरोप-प्रत्यारोप सुरूच आहेत. ठाकरे गटाचे आमदार विनायक राऊतांनीही या दिल्ली भेटीवरून मोठा दावा केला आहे. आज त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना ही माहिती दिली. विनायक राऊत म्हणाले की, "अजित पवारांना पश्चाताप होतोय, त्या पश्चातापातून कसं मुक्त व्हायचं याकरता ते विचार करत आहेत. अजित दादा स्पष्टवक्ते आहेत. त्यांच्या कार्यक्षमतेला वाव देण्याचं काम ठाकरेंनी केलं होतं. परंतु, आता त्यांची गळचेपी होत असल्याचं प्रत्येक विधानातून दिसून येतंय. ते पुढे म्हणाले की, मागच्या आठवड्यातही दिल्लीला जाऊन



अजित पवारांनी अमित शाहांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी शिंदेंचं विसर्जन झाल्यावर (मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा कार्यकाळ संपल्यावर) आपल्याला मुख्यमंत्री करावं अशी मागणी केल्याची माहिती आहे. अजित पवारांनी १० नोव्हेंबर रोजी दिल्लीत जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. अमित शाह यांच्या भेटीच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, महाराष्ट्र अध्यक्ष सुनील तटकरे हे देखील सोबत होते. मागील काही दिवसांमध्ये राज्यात राजकीय घडामोडी सुरू आहेत. मराठा आरक्षण आंदोलन, ओबीसी आरक्षण आंदोलनाचा मुद्दा तापला आहे. राज्यात मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून महायुतीच्या सरकारमधल्या मंत्र्यांची वेगळी विधानं दिसून आली तसंच मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे एकटेच आंदोलनाला सामोरे जात असल्याचे चित्र होते.

### ओबीसी आरक्षण आंदोलनाचा मुद्दा तापला

» अजित पवारांनी १० नोव्हेंबर रोजी दिल्लीत जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. अमित शाह यांच्या भेटीच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, महाराष्ट्र अध्यक्ष सुनील तटकरे हे देखील सोबत होते. मागील काही दिवसांमध्ये राज्यात राजकीय घडामोडी सुरू आहेत. मराठा आरक्षण आंदोलन, ओबीसी आरक्षण आंदोलनाचा मुद्दा तापला आहे. राज्यात मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून महायुतीच्या सरकारमधल्या मंत्र्यांची वेगळी विधानं दिसून आली तसंच मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे एकटेच आंदोलनाला सामोरे जात असल्याचे चित्र होते.

# आरक्षण वाढवले; पण नोकऱ्या कुठे आहेत?

## बिहारमध्ये 1.5 टक्के लोकांकडे सरकारी नोकरी

**। नवी दिल्ली ।**

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी जातनिहाय सर्वेक्षण केल्यानंतर राज्यातील आरक्षणाची मर्यादा वाढवून, ती ६५ टक्क्यांवर नेण्यात आली. सरकारी नोकरी आणि शैक्षणिक क्षेत्रासाठी असलेली ५० टक्क्यांची मर्यादा ६५ टक्के करण्यासाठी विधेयकही मंजूर करण्यात आले. जातनिहाय सर्वेक्षणातून नितीश कुमार यांनी राजकीय गणिते आखली असली तरी याच सर्वेक्षणामुळे त्यांच्यासमोर आव्हानेही निर्माण झाली आहेत.**

२ ऑक्टोबर रोजी जाहीर झालेल्या सर्वेक्षणाच्या अहवालामध्ये राज्यातील किती लोकांकडे सरकारी नोकरी आहे, याची तपशीलवार माहिती उघड झाली आहे. बिहारमधील १३.०७ कोटी जनतेपैकी फक्त १.५ टक्के लोकांकडे (जवळपास २०.४९ लाख) सरकारी नोकरी आहे. एकूण लोकसंख्येपैकी सरकारी नोकरी असण्याचे प्रमाण नगण्य असल्यामुळे आता नितीश कुमार यांच्यासमोर सरकारी नोकऱ्या उपलब्ध करून देण्याचे आव्हान उभे राहिले आहे. सर्वेक्षणामध्ये सरकारी नोकरदारांचा आकडा तर मिळाला आहेच; पण त्याशिवाय या नोकरदारांमध्ये कोणत्या जातीचे किती लोक आहेत? याचीही माहिती उघड झाली आहे. राज्यातील १५.५ टक्के जनता खुल्या प्रवर्गात मोडते. या खुल्या प्रवर्गातील ३१.२९ टक्के लोकांकडे सध्या सरकारी नोकरी असल्याचे उघड झाले आहे. बिहारमध्ये ओबीसी प्रवर्गातील लोकसंख्या २७.१२ टक्के असून, त्यापैकी केवळ १.७५ टक्के लोक सरकारी नोकरीमध्ये आहेत. अनुसूचित जातींची लोकसंख्या १९.६५ टक्के; तर अनुसूचित जमातींची लोकसंख्या १.६८ टक्के एवढी आहे. या प्रवर्गातून अनुक्रमे १.१३ टक्के व १.३७ टक्के लोक सरकारी नोकरीमध्ये असल्याचे या सर्वेक्षणातून समोर आले आहे. अत्यंत मागासवर्गीय समाज' (EXTREMELY BACKWARD CLASSES– EBC) राज्यात सर्वांत मोठ्या संख्येने आहे.



लोकसंख्येनुसार त्यांची संख्या ३६.०१ टक्के एवढी आहे. मात्र, सरकारी नोकरीमध्ये त्यांचे प्रमाण सर्वांत कमी असून, ते एक टक्क्याच्याही खाली ०.९८ टक्के इतके आहे. मात्र, अद्याप तरी सरकारी नोकरभरतीचा कार्यक्रम जाहीर झालेला नाही. सरकारने आतापर्यंत १.२२ लाख शिक्षकांची नोकरभरती केली असून, १.२२ लाख पदे आणखी भरणार असल्याचे जाहीर केले आहे. उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनीही सरकारी नोकरभरती करण्याबाबत वारंवार विश्वास व्यक्त केला आहे. "आमचे वचन पूर्ण करण्यासाठी आम्ही वेगाने प्रयत्न करीत आहोत. स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी सरकारकडून अनुदान आणि प्रोत्साहन देणाऱ्या रोजगार योजना राबविल्या जात आहेत. बिहार सरकारने जातनिहाय सर्वेक्षण केल्यानंतर सरकारी नोकरी आणि शैक्षणिक क्षेत्रातील आरक्षण ५० टक्क्यांवरून ६५ टक्के केले आहे. नितीश कुमार पहिल्यांदा २००० साली सत्तेत आले. २००७ साली त्यांच्या सरकारने सरकारी नोकरभरती सुरू केली. मागच्या १६ वर्षांत त्यांच्या सरकारने आठ लाख लोकांना सरकारी नोकरी दिली असल्याचा दावा त्यांच्याकडून करण्यात येतो. ऑक्टोबर २०२० मध्ये विरोधकांवर टीका करताना नितीश कुमार म्हणाले की, लालू प्रसाद – राबडी देवी सरकारच्या काळात (१९९० आणि २००५) केवळ ९५ हजार लोकांना सरकारी नोकरी प्राप्त झाली. पाटणा विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे माजी प्रमुख एन. के. चौधरी यांनी द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना सांगितले, "शेतीवरील अवलंबित्व कमी करून, इतर क्षेत्रांमध्ये जोपर्यंत नोकऱ्या निर्माण करण्याचा गंभीर प्रयत्न होत नाही, तोपर्यंत सरकारी नोकऱ्या निर्माण करता येणार नाहीत. सरकारी नोकरभरती करू, असे नितीश कुमार यांचे आश्वासन हे अतार्किक आणि राजकीयदृष्ट्या प्रेरित आहे. आगामी लोकसभा आणि त्यानंतर येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे वक्तव्य केले गेल्याचे दिसते.भाजपाचे उपाध्यक्ष संतोष पाठक म्हणाले की, बिहार सरकारने नुकतीच ९४ लाख गरीब कुटुंबांना दोन लाख रुपये आणि ६३,००० कुटुंबांना एकरकमी एक लाख रुपये देण्याची घोषणा केल्यामुळे राज्यावर २.५ लाख कोटींचा अतिरिक्त बोजा पडला आहे. पगार आणि मानधनवाढीमुळे तिजोरीवर आणखी भार पडेल.

### खासगी आणि असंघटित क्षेत्र

» जातनिहाय सर्वेक्षणामधील आकडेवारीनुसार, राज्यातील १५.९ लाख लोक (लोकसंख्येच्या प्रमाणात केवळ १.२१ टक्के) खासगी क्षेत्रात नोकरी करीत आहेत. असंघटित क्षेत्रात २७.९ लाख (२.१३ टक्के) लोक काम करीत आहेत. सर्वेक्षणानुसार ३९.९१ लाख (३.०५ टक्के) लोक स्वयंरोजगार क्षेत्रात कार्यरत आहेत. ओबीसी आणि ईबीसी वर्गाची या क्षेत्रातील संख्या अधिक आहे. लोकसंख्येतील जवळपास २.१८ कोटींचा मोठा वर्ग रोजंदारी आणि मजुरी करतो. बिहारमध्ये ३३.८१८ भिकारी असून, २८,३५५ लोक कचरावेचक आहेत. शेतीवर आधारित असलेल्यांचीही संख्या सर्वेक्षणातून दिसून आली आहे. राज्यातील एक कोटीची लोकसंख्या शेतीशी निगडित आहे.

---

# 'मूर्खांचे सरदार' टीकेवरुन मोदींना राहुल गांधींचं उत्तर

## जितके पैसे मोदी अदाणींना देतात तेवढा पैसा मी गरीबांना देणार


**। नवी दिल्ली ।**

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी माझ्यावर जितकी टीका करतील, मला जितक्या शिव्या देतील, दूषणं देतील तितका माझ्यातला हुरुप वाढत जाईल. असं म्हणत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या टीकेला उत्तर दिलं आहे. 'मूर्खांचे सरदार' असं म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राहुल गांधींचं नाव न घेता त्यांच्यावर टीका केली होती. या टीकेला आता राहुल गांधी यांनी जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. छत्तीसगढ या ठिकाणी राहुल गांधी एका सभेत बोलत होते. त्यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना प्रत्युत्तर दिलं आहे.**

"पंतप्रधान नरेंद्र मोदी जिथे कुठे जातात, तिथे माझ्याविषयी चुकीचे शब्द प्रयोग करतात. मला शिव्या द्या, माझ्या विषयी उलटसुलट बोलतात. चांगलं आहे, मला काही फरक पडत नाही. मी माझं लक्ष्य काय आहे तुम्हाला सांगितलं आहे. मला कितीही दूषणं दिली तरीही माझं लक्ष्य ठरलेलं आहे. जितके पैसे नरेंद्र मोदी अदाणींना देतात तेवढा पैसा मी गरीबांना देणार. एक रुपया तुम्ही अदाणींना दिलात तर एक रुपया मी गरीबांना देणार. जेवढे पैसे तुम्ही अदाणींना द्याल तेवढे पैसे मी गरीबांना देईन, त्यात छोटे दुकानदार, मजूर, बेरोजगार युवक सगळेच असतील. मी तुम्हाला सांगेन की खरं राजकारण अब्जाधीशांना मदत करुन होत नसते. खरं राजकारण गरीब





शेतकरी, मजूर, छोटे दुकानदार यांना मदत केल्यानंतर होते. तुम्हाला मला जे काही बोलायचं आहे ते बोला. ज्या शिव्या द्यायच्या आहेत त्या द्या. मला जितक्या शिव्या देता त्यावरुन मला कळतं की मी बरोबर काम करतो आहे. जेवढ्या शिव्या द्याल मला कळतं मी योग्य मार्गावर आहे. मी चांगलं काम करतो, तुम्ही चिडता म्हणून तर शिव्या देता ना?" असंही राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी काँग्रेस पक्षावर जोरदार टीका केली. देशात पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका असल्यामुळे प्रचाराची धामधूम सुरू आहे. त्यातच राजकीय नेते एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्याची एकही संधी सोडताना दिसत नाहीत. नुकतेच पंतप्रधान मोदी यांनी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांना "मूर्खांचे सरदार" असल्याचे संबोधले. भारतात वापरले जाणारे मोबाइल हे शक्यतो चीनमधून तयार होऊन आलेले आहेत, अशी टिप्पणी राहुल गांधी यांनी केली होती. या टीकेला प्रत्युत्तर देत असताना पंतप्रधान मोदी म्हणाले, "भारत आता एक लाख कोटी रुपयांहून अधिक किंमतीचे मोबाइल निर्यात करणारा देश बनला आहे. काँग्रेस नेते भारताच्या यशाकडे दुर्लक्ष करण्याच्या मानसिक आजाराने ग्रासले आहेत." राहुल गांधी यांचे नाव न घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, "काँग्रेसच्या काही शहाण्यांनी टीका केली. भारतातील लोक चीनमधून आलेले मोबाइल वापरतात, असे त्यांनी सांगितले.

### राहुल गांधी मूर्खांचे सरदार : पंतप्रधान मोदी

» पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी काँग्रेस पक्षावर जोरदार टीका केली. देशात पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका असल्यामुळे प्रचाराची धामधूम सुरू आहे. त्यातच राजकीय नेते एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्याची एकही संधी सोडताना दिसत नाहीत. नुकतेच पंतप्रधान मोदी यांनी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांना "मूर्खांचे सरदार" असल्याचे संबोधले. भारतात वापरले जाणारे मोबाइल हे शक्यतो चीनमधून तयार होऊन आलेले आहेत, अशी टिप्पणी राहुल गांधी यांनी केली होती. या टीकेला प्रत्युत्तर देत असताना पंतप्रधान मोदी म्हणाले.

# विराटच्या 'बायोपिक'मध्ये मला काम करायचंय!



ज्या क्षणाची सारे भारतीय क्रिकेट चाहते आतुरतेनं वाट पाहत होते तो क्षण आला आणि वानखेडे स्टेडियमवरील असंख्य प्रेक्षकांनी तो डोळ्यात साठवला. भारताचा विक्रमी फलंदाज विराट कोहलीनं अखेर भारतीय क्रिकेटचा देव म्हणवल्या जाणाऱ्या सचिन तेंडुलकरच्या वन डे तील पन्नास शतकांचा विक्रम मोडीत काढला आहे. विराटनं सचिनचं रेकॉर्ड ब्रेक केल्याचे दिसून आले आहे. यानंतर सोशल मीडियावर वेगवेगळ्या प्रतिक्रियांना उधाण आले आहे. लाखो चाहत्यांनी विराटचे कौतुक केले आहे. त्याला शुभेच्छा देत त्याचे अभिनंदन देखील केले आहे. अशावेळी एका बातमीनं नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. ती म्हणजे विराटच्या बायोपिकची जोरदार चर्चा होताना दिसत आहे. बॉलीवूडच्या एका प्रसिद्ध अभिनेत्यानं आपल्याला विराटच्या बायोपिकमध्ये काम करायला आवडेल असे सांगून लाखो चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. आपण दिसायला देखील विराट सारखेच आहोत त्यामुळे ही भूमिका आपल्याला करायला मिळेल. असाही विश्वास त्या अभिनेत्यानं व्यक्त केला आहे. तो अभिनेता दुसरा तिसरा कुणी नसून प्रख्यात अभिनेता रणबीर कपूर आहे. त्यानं दिलेली प्रतिक्रिया चर्चेत आली आहे. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर बॉलीवूडमधील अनेक सेलिब्रेटींनी हजेरी लावली आहे. त्यामध्ये साऊथच्या अभिनेत्याचाही समावेश आहे. रणबीर कपूर, जॉन अब्राहम, कियारा अडवाणी, अनुष्का शर्मा, शाहिद कपूर, विकी कौशल या सेलिब्रेटींनी हजेरी लावली होती. दुसऱ्या इनिंगच्यावेळी देखील सेलिब्रेटी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे. रणबीरनं भारतीय क्रिकेट टीमच्या प्रती आपलं समर्थन देत मला तर येत्या काळात कुणाच्या बायोपिकमध्ये काम करायला आवडेल असे विचारले तर मी विराटचं नाव घेईन.

## मन्ना अडकणार लग्नबंधनात!

बॉलिवूड अभिनेत्री तमन्ना भाटिया (TAMANNAAH BHATIA) आणि अभिनेता विजय वर्मा (VIJAY VARMA) सध्या चर्चेत आहेत. तमन्ना आणि विजयची जोडी कायमच सोशल मीडियावर चर्चेत असते. अनेकदा त्यांना एकत्र स्पॉट करण्यात आलं आहे. आता लवकरच ते लग्नबंधनात अडकणार असल्याचं समोर आलं आहे. तमन्ना भाटिया आणि विजय वर्मा लवकरच लग्नबंधनात अडकणार आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून त्यांच्या डेटिंगच्या चर्चा रंगल्या होत्या. नुकतेच एका दिवाळी पार्टीत तमन्ना आणि विजय एकत्र स्पॉट झाले आहेत. आता त्यांच्या लग्नासंदर्भात एक नवी अपडेट समोर आली आहे. तमन्ना भाटिया आणि विजय वर्मा गेल्या काही दिवसांपासून एकमेकांना डेट करत आहेत. त्यांच्या डेटिंगच्या चर्चाही सोशल मीडियावर रंगल्या आहेत. आता त्यांच्या लग्नासंदर्भात नवी माहिती समोर आली आहे. तेलुगू वन न्यूजच्या रिपोर्टनुसार, तमन्ना आणि विजय जोडीदार म्हणून एकमेकांचा विचार करत आहेत. आपल्या नात्याला नवं नाव देण्याचा ते विचार करत आहेत". मीडिया रिपोर्टनुसार, तमन्ना भाटियाचं वय 30 पेक्षा जास्त आहे. त्यामुळे कुटुंबियांकडून लग्न करण्यासाठी तिच्यावर दबाव टाकला जात आहे. पण आता तमन्ना भाटिया आणि विजय वर्मा यांनी संसार थाटण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे त्यांचे चाहते आनंदी झाले आहेत. तमन्ना आणि विजयचे चाहते त्यांच्या लग्नाची आतुरतेने वाट पाहत आहेत.

## फ्लाईंग किस अन् आनंदाश्रू



क्रिकेटचा देव म्हणून ज्याच्याकडे पाहिले जाते त्या मास्टर ब्लास्टर सचिनच्या नावावर वन डे क्रिकेटमध्ये जो ४९ शतकांचा विक्रम आहे तो भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीनं मोडला आहे. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर आज भारत विरुद्ध न्युझीलंड यांच्यात सेमीफायनलचा सामना रंगतो आहे. त्यात विराटनं उपस्थित हजारो प्रेक्षकांना अन् चाहत्यांना जिंकून घेतले आहे. वानखेडे स्टेडियमवर जोरदार दिवाळी साजरी झाल्याचे दिसून आले आहे. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे विराटचं पन्नासावे शतक. गेल्या अनेक दिवसांपासून विराटच्या त्या शतकाची अपेक्षा होती. अखेर भाऊबीजेच्या दिवशी विराटनं त्या मोठ्या विक्रमाला गवसणी घालत सचिनला हजारो प्रेक्षकांच्या उपस्थितीत अभिवादन केले आहे. या सगळ्यात चर्चा रंगली ती अनुष्काच्या प्रतिक्रियेची. विराटनं शतक झाल्यावर प्रेक्षकांना बॅट दाखवून त्यांच्या अभिवादनाचा स्विकार करत असताना अनुष्काकडे पाहिले अन् हजारो चाहत्यांनी एकच गजर केला. अनुष्कानं त्याच्याकडे पाहत फ्लाईंग किसचा वर्षाव केला. त्याचे व्हिडिओ आता सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्याला नेटकऱ्यांनी दिलेल्या प्रतिक्रियाही कौतुकास्पद आहे. विराटनं बाद झाल्यानंतर देखील अनुष्काकडे पाहत तिच्या शुभेच्छांचा स्विकार केल्याचे व्हिडिओ लक्ष वेधून घेताना दिसत आहे. भारतानं पहिल्यांदा फलंदाजी करत तब्बल ३९७ धावांचा डोंगर उभा केला आहे. हे आव्हान आता न्युझीलंडला अंतिम फेरीमध्ये प्रवेश करण्यासाठी पार करावे लागणार आहे. भारताच्या सलामीच्या फलंदाजांनी केलेली जोरदार सुरुवात याच्या जोरावर मोठी धावसंख्या उभारली आहे. यात रोहित शर्मा, शुभमन गिल, श्रेयस अय्यर आणि केएल राहुल यांच्या खेळीचाही मोठ्या धावसंख्येत मोलाचा वाटा आहे. विराटनं त्याच्या प्रतिक्रियेमध्ये म्हटले आहे की, एका महान फलंदाजानं माझं कौतुक केलं याचं मला अप्रुप आहे. त्याचा मी आदरच करतो. माझ्या या खेळीचे श्रेय श्रेयस अय्यरला जाते. याचबरोबर रोहित, गिल यांनी देखील चांगली सुरुवात करुन दिली.

## वानखेडेवर बॉलीवूडच्या सेलिब्रेटींची झाली गर्दी!

भारत आणि न्युझीलंडच्या सामन्याची चुरस कमालीची वाढल्याचे दिसून येत आहे. भारतानं पहिल्यांदा फलंदाजी करताना न्युझीलंडच्या गोलदाजांना सळो की पळो करुन सोडले आहे. रोहितनं टॉस जिंकून पहिल्यांदा फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि सलामीच्या फलंदाजीनं जोरदार सुरुवात केल्याचे दिसून आले. मुंबईतील वानखेडे मैदानावर आज भारत विरुद्ध न्युझीलंडचा सेमीफानयलचा सामना होत आहे. यंदाच्या वर्ल्ड कपमध्ये भारतानं प्रभावी खेळ करत विजयाची मालिका सुरुच ठेवली आहे. आजचा सामना जिंकून भारतानं वर्ल्ड कप जिंकून द्यावा. अशी मागणी कोट्यवधी भारतीयांनी केल्याचे यावेळी दिसून येत आहे. अशातच आजचा सामना पाहण्यासाठी बॉलीवूडच्या विविध सेलिब्रेटींनी गर्दी केल्याचे दिसून आले आहे. साऊथ फिल्म इंडस्ट्रीचे प्रसिद्ध अभिनेते थलायवा अर्थात रजनीकांत हे आजचा सामना पाहण्यासाठी वानखेडेवर येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. अभिनेता जॉन अब्राहम, शाहिद कपूर, रणबीर कपूर, कियारा अडवानी, अनुष्का शर्मा, सिध्दार्थ मल्होत्रा या सेलिब्रेटींनी व्हिआयपी बॉक्समध्ये गर्दी केल्याचे दिसून आले आहे. अशावेळी दुसऱ्या इनिंगमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर सेलिब्रेटी येणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. भारताचा सेमी फायनलमधील प्रवेश निश्चित झाला आणि मुंबईतील वानखेडे स्टेडियमवरील सामन्याची चर्चा सुरु झाली आहे. काही झालं तरी भारत यंदाच्या वर्ल्ड कपवर स्वताच्या नावाची मोहोर उमटविणार असा विश्वास कोट्यवधी भारतीय क्रिकेट चाहत्यांना आहे.

## नाना पाटेकरांचं चाहत्यासोबतच्या गैरवर्तणुकीचं सत्य आलं समोर

बॉलीवूडचे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर नेहमीच आपल्या दमदार अभिनयामुळे आणि भूमिकांसाठी चर्चेत असतात, मात्र यावेळी ते लोकांच्या निशाण्यावर आले आहेत. याचं कारण म्हणजे, नाना पाटेकर यांनी रागाच्या भरात एका चाहत्याला चापट मारली आहे. अभिनेत्याने चाहत्यासोबत केलेल्या गैरवर्तणुकीचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. आता नानांच्या चित्रपटाच्या दिग्दर्शकाने दावा केला आहे की, व्हायरल होत असलेला व्हिडिओ त्यांच्या चित्रपटातील सीन आहे. नानांनी त्यांच्या एका चाहत्याला फटकावल्याचे दिसून आले आहे. त्या व्हायरल झालेल्या व्हिडिओनं वेगवेगळ्या चर्चेला उधाण आले आहे.



तो चाहता नानांसोबत फोटो काढण्यासाठी पुढे येतो तेवढ्यात नाना त्याच्या डोक्यात मारुन त्याला तिथून पिटाळून लावतात. हा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगानं व्हायरल झाला असून नेटकऱ्यांनी मात्र नानांना ट्रोल केले आहे. नाना पाटेकरांचा व्हिडिओ वाराणसीतील दशाश्वमेध घाटातील आहे. अभिनेता गेल्या अनेक दिवसांपासून येथे त्याच्या आगामी 'जर्नी' चित्रपटाचे शूटिंग करत आहे. दशाश्वमेध घाटाच्या वाटेवर नानांच्या 'जर्नी' चित्रपटाचे शूटिंग सुरू होते. कपडे आणि टोपी घालून नाना शूटिंगसाठी तयार झाले होते. नानांचे लक्ष शूटिंग आणि त्यांच्या संवादांवर होते.

# भारताची विराट खेळी!

## ‘सुपर सेव्हन’सह मोहम्मद शमी किमयागार




**विराट कोहली**

**100@50**

**शतकाचे अर्ध शतक पुर्ण**

विराट कोहली : 674 धावा (10 सामने)* विश्वचषक 2023

सचिन तेंडुलकर : 673 धावा (11 सामने) विश्वचषक 2003

मॅथ्यू हेडन : 659 धावा (11 सामने) विश्वचषक 2007

रोहित शर्मा : 648 धावा (9 सामने) विश्वचषक 2019

डेव्हिड वॉर्नर : 647 धावा (10 सामने) विश्वचषक 2019

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**विश्वचषक सामन्याच्या उपांत्यफेरीत दमदार विजय मिळवत भारताने अंतिम फेरीत धडक मारली आहे. विशेष म्हणजे आज या सामन्यात मोहम्मद शमीने सात विकेट घेत मोठी कामगिरी बजावली आहे. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर बुधवारी (१५ नोव्हेंबर) खेळल्या गेलेल्या उपांत्य फेरीत न्यूझीलंडचा ७० धावांनी पराभव करत भारताने विश्वचषकाच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. भारतीय संघ चौथ्यांदा अंतिम फेरीत पोहोचला आहे. यापूर्वी टीम इंडिया 1983, 2003 आणि 2011 मध्ये या स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचला होता. या सामन्या दरम्यान टीम इंडियाच्या मोहम्मद शमीने सर्वाधिक 7 बळी मिळवले. तर जसप्रित बुमराह आणि कुलदीप यादवला 1-1 विकेट मिळाली.**

भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने विश्वचषकाच्या आजच्या सामन्यात एक मोठा विक्रम केला आहे. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर बुधवारी (१५ नोव्हेंबर) न्यूझीलंडविरुद्धच्या उपांत्य फेरीत त्याने जबरदस्त गोलंदाजी करत एकूण सात बळी घेतले. त्याने त्याच्या संपूर्ण कार्यकाळात विश्वचषकात एकूण ५४ बळी घेतले आहेत. त्याच्या या कामगिरीमुळे इतक्या विकेट घेणारा शमी हा पहिला भारतीय गोलंदाज ठरला आहे. तसेच शमीने ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कचा विक्रमही मोडला. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या उपांत्य फेरीत न्यूझीलंडचा 70 धावांनी पराभव करत भारताने विश्वचषकाच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. भारतीय संघ चौथ्यांदा अंतिम फेरीत पोहोचला आहे. यापूर्वी टीम इंडिया 1983, 2003 आणि 2011 मध्ये या स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचला होता.भारताने टॉस जिंकून पहिला फलंदाजी केली. त्यानंतर विराट कोहली (117), श्रेयस अय्यर (105), शुबमन गिल (नाबाद 80), रोहित शर्मा (47), केएल राहुल (नाबाद 39) यांच्या धमाकेदार फलंदाजीच्या जोरावर टीम इंडियाने 4 विकेट्सच्या मोबदल्यात 397 धावांचा डोंगर रचला. या विशाल आव्हानाचा पाठलाग करताना किवी संघ 48.5 षटकांत सर्व विकेट्स गमावून 327 धावांपर्यंत मजल मारू शकला. त्यांच्या डॅरेल मिचेलने (134), केन विल्यमसन (69), ग्लेन फिलिप्स (41) यांनी सामना जिंकण्यासाठी झुंज दिली. टीम इंडियाच्या मोहम्मद शमीने सर्वाधिक 7 बळी मिळवले. तर जसप्रित बुमराह आणि कुलदीप यादवला 1-1 विकेट मिळाली. (TEAM INDIA IN WC FINAL)

398 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या न्यूझीलंडची सुरुवात खराब झाली. पॉवरप्लेमध्ये 46 धावा करताना संघाने सलामीवीरांच्या विकेट्स गमावल्या. रचिन रवींद्र आणि डेव्हन कॉनवे प्रत्येकी 13 धावा करून बाद झाले. पॉवरप्लेच्या सुरुवातीच्या षटकात किवी सलामीवीरांनी सावधपणे शॉट्स खेळले. 5 षटकांत संघाची धावसंख्या बिनबाद 30 धावा होती. येथे मोहम्मद शमीने पहिल्याच चेंडूवर यश संपादन केले आणि कॉनवेला बाद केले. एवढेच नाही तर शमीने रचिन रवींद्रला ८व्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर यष्टिरक्षक केएल राहुलकडे झेलबाद केले. त्यानंतर केन विल्यमसन आणि डॅरिल मिचेल यांच्यामध्ये चांगली भागीदारी झाली. या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी शतकी भागीदारी रचली. मिचेल आणि केन या दोघांनी आपली अर्धशतकं पूर्ण केली. रोहितने ही जोडी फोडण्याची जबाबदारी शमीवर टाकली. शमीनेही संघाला नाराज केले नाही आणि आपल्यावर ठेवलेला विश्वास सार्थ ठरवला. शमीने एकाच षटकात दोन विकेट्स मिळवल्या. त्यानंतर शमीने टॉल लॅथमची शिकार केली. त्यानंतर मिचेल आणि फिलिप्स यांनी काहीकाळ झुंज दिली पण त्यांना त्यात अपयश आले. काही अंतरांनी विकेट पदत गेल्या. आणि अखेर किवी संघ ऑलआऊट झाला.



### कोहली आणि अय्यर शतकवीर ठरले

» भारताकडून विराट कोहली आणि श्रेयस अय्यर यांनी शानदार शतकी खेळी खेळली. कोहलीने त्याच्या एकदिवसीय कारकिर्दीतील 50 वे शतक झळकावले. कोहलीने 113 चेंडूत 9 चौकार आणि 2 षटकारांच्या मदतीने 117 धावा केल्या. तर चौथ्या क्रमांकावर आलेल्या श्रेयस अय्यरने 70 चेंडूत 150 च्या स्ट्राईक रेटने 105 धावा केल्या. अय्यरने या खेळीत 4 चौकार आणि 8 शानदार षटकार मारले.




**शमी**

**50**

**विश्वचषकात शमीच्या विकेटचे अर्धशतक पूर्ण**

### यंदाच्या विश्वचषकात सर्वाधिक विकेट शामीच्या नावावर

मोहम्मद शामी यांच्या विश्वचषकात सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज झालाय. शामी पहिल्या चार सामन्यात बेंचवर बसला होता. मीने फक्त सहा सामन्यात 23 विकेट घेण्याचा पराक्रम केला आहे.